**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव – देवीदास रामराव गायकवाड
वय वर्षे – ८३ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त
रा. – आष्टा ता. चाकूर जि. लातूर.

**फिर्यादी तर्फे फिर्यादीचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री– एन.बी. बद्दे यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

वैद्यकीय अधिकारी नळेगाव यांनी सपोर्ट ग्रुप लेखा शिर्षाखाली उपकेंद्र आष्टा यांना रु.४०,२५०/– चा निधी पुरविला आहे. वेळोवेळी वैद्यकीय अधिकारी यांनी रोखीने आरोपीकडून निधी मिळाल्याच्या पावत्या घेतल्या आहेत. त्या पुराव्याकामी दाखल केल्या आहेत.

सन २०१० नंतर वैद्यकीय अधिकारी उपकेंद्र आष्टा यांच्या बँकेचे खाते क्र.६८७६ लातुर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लातूर शाखा नळेगाव येथे डायरेक्ट निधी जमा करत होते. सदर खात्याची सत्यप्रत न्यायालयात दाखल आहे. सन २००६ ते दि. ०५.०९.२००८ पर्यंत आरोपीने आष्टा उपकेंद्राचे खाते बँकेत उघडले नाही आणि त्या कालावधीमधील मिळालेला निधी बेकायदेशिरपणे स्वतःच्या हातात ठेवला. त्या काळामध्ये बनावट अनुदान वाटप रजीस्टर आणि रोकडवही तयार करुन अपात्र् मातांना निधी वाटप दाखवून रु.३०,१००/– चा अपहार केला आहे. त्या अनुदान वाटप रजीस्टर व रोकडवहीवर सरपंचाची सही नाही.

आरोपीने अपहार करण्यासाठी शन्नु महंमद पठाण ही माता आष्टा उपकेंद्रामध्ये प्रसुती झाल्याची खोटी नोंद घेतली आहे. तसेच तिचा खोटा प्रसुतीचा

दिनांक दाखविला. १५५ दिवसांचा विलंब असून आरोपीने रु.७००/- त्या मातेला मिळालेत असे खोटे दाखवून तितक्या रक्कमेचा अपहार केला. मुक्ता कल्याणराव भनगीरे ही माता दि. २६.११.२००६ रोजी भांतागळी आरोग्य उपकेंद्र प्रसुती झाल्याची खोटी नोंद आष्टा उपकेंद्राच्या अनुदान रजीस्टरला घेतली आहे. या मातेच्या नावे आरोपीने रु.३००/- त्या मातेच्या प्रसुतीपुर्वी ३३६ दिवस अगोदर उचलले आहे आणि रु.१००/- दरमहा वाटप केले असे दाखवून त्या निधीचा अपहार केला. त्यानंतर ११५ दिवस विलंबाने रु.३००/- वाटप दाखवून अपहार केला. त्यानंतर ३८८ दिवस विलंबाने रु.२८८/- वाटप दाखवून अपहार केला. माता ही रु.७००/- अनुदानास पात्र् असून तिच्या नावे रु.८००/- इतका अनुदान वाटप दाखवून आरोपीने अपहार केला आहे.

वैद्यकीय अधिकारी आरोग्य केंद्र भातांगळी यांनी मुक्ता कल्याण भनगीरे ही माता त्यांच्या केंद्रामध्ये प्रसुत झाली नाही असे आम्हाला सन २०१६ मध्ये पत्रानिशी कळविले.

उर्वरित सरतपास फिर्यादीच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यत तहकुब करण्यात येतो.

माझे समक्ष श्रवणोत्तर स्वीकृत

DIVYA Digitally signed by DIVYA Date: 2025.12.05 14:51:12 +0530

(श्रीमती दि.सा. करभाजन)

दिनांकः ०५/१२/२०२५ न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, चाकूर

न्यायालय क्र.२.